भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र .८१४/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १४/१२/२०१७

**१) अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक १३/१२/२०१७ चे ७.०० वाजता दरम्यान यातील फिर्यादीने ही तिचे अंगनात सडा टाकीत असतांनी आरोपी क्र. २ हीने माझे घरात सडा कशाला टाकते? असे म्हणुन अश्लिल शब्दात शिवीगाळ केल्याने फिर्यादीचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन दिघोरी येथे कलम २९४, ५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. तलमले पोलीस स्टेशन दिघोरी हे करीत आहेत.

**२) जुन्या भांडणावरून भांडण करून लोखंडी रॉडने कपाळावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक १२/१२/२०१७ चे २२.३० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी मंडईचे कार्यक्रम पाहण्यास गेला असता, यातील आरोपीतांनी संगनमत करून जुन्या भांडणा वरून फिर्यादी सोबत भांडण करून कपाळावर लोखंडी रॉडने मारून जखमी केल्याने, फिर्यादी अभिषेक सुनिल शेंडे वय १७ वर्ष रा. दवडीपार यांचे तोंडी व डॉ. रपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम ३२४,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**३) मालमत्तेची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक २९/१०/२०१४ ते १६/०३/२०१७ पर्यंत यातील आरोपी क्र.०१ व ०२ यांनी संगनमत करून अर्जदारा कडुन पैसे लुबाडण्या करीता एकमेकाच्या मदतीने स्वत:चे हित साध्य करण्याकरीता अर्जदाराचे मालकीचे ट्रॅक्टर महिंद्रा ५७५ सरपंच कंपनीचा ४०ए ४९०९ व मॉडेल न. २००६ चे चेचीस इंजीन नंबर एनटी आर ८७०६ हा पुन्हा आपल्या नावाने, केल्याने (फायनान्स) करून अर्जदारची मालमत्तेची फसवणुक केली. अर्जदारानी अशी तक्रार मा. जेएमएफसी सा. तुमसर यांना केल्याने, त्याचे जाक्र. अनु. क्र. ०८ असुन गुन्हा दाखल करून तपास कामी प्राप्त झाल्याने व मा. सपोनी. सा. यांच्या लेखी आदेशावरून पो.स्टे. गोबरवाही येथे कलम ४२०,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. जायले पोलीस स्टेशन गोबरवाही हे करीत आहेत.

**४) स्वत:चे व्यक्तीगत जिवीतास धोका निर्माण होईल असे हयगयीचे कृत्य केल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक १३/१२/२०१७ चे १२.४५ ते १३.३० वाजता दरम्यान यातील आरोपीने जिल्हाधिकारी कार्यालयाचे परिसरातील झाडावर चढुन स्वत:चे व्यक्तीगत जिवीतास धोका निर्माण होईल असे हयगयीने कृत्य केल्याने सरतर्फे फिर्यादी पोशि. डोरले यांचे रिपोर्ट वरून पो.स्टे. भंडारा येथे कलम ३३६ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. थेर पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) एचपी गॅस सिलेंडरची चोरी:—**

दिनांक १३/१२/२०१७ चे १६.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही आपले घरघुती काम करून घराचा दार खुला ठेवुन शेजारी बसण्यास गेली असता, यातील संशयीत आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन घरातील किचन रूम मधील १ एचपी कंपनीचा गॅस सिलेंडर कि. १५,००/रु. चा चोरून नेल्याने फिर्यादी श्रीमती प्रमिला दादाराव उके वय ५२ वर्ष रा. पेट्रोलपंप ठाणा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. जवाहरनगर येथे कलम ३८० भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील

६) अल्पवयीन मुलीचा विनय भंग केल्याने गुन्हा नोंदः–

दिनांक १२/१२/२०१७ चे १६.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी ही शाळेतुन घरी परत जात असतांना बसस्टॉप जवळ फिर्यादीच्या गालावर मारून निवयभंग केल्याने, फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट पो.स्टे. जवाहरनगर येथे कलम ३५४,३२३ भादवी.सहकलम ८ पोक्सो अॅक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनी. ताराम पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत

७) उपचारा दरम्यान इसमाचा मृत्युः–

दिनांक २४/११/२०१७ चे १०.०० वाजता दरम्यान यातील मृतक अन्ना वासुदेव गोमासे वय ३४ वर्ष रा.मुंढरी हा मोटार सायकलने स्लीप होवुन पडुन त्याचे कोथ्याला मार लागल्याने उपचारा दरम्यान मेडीकल कॉलेज नागपुर येथे दि. ०१/१२/२०१७ चे १६.४५ वा. मरण पावला ते पो.स्टे. अजनी नागपुरचे प्राप्त मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जा.फौ. चे कागद पत्रावरून व मा. पिएसओ. सा. यांचे आदेशाने पो.स्टे. करडी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. कटरे पो.स्टे. करडी हे करीत आहेत.

८) उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यः–

दिनांक २/१२/२०१७ चे १४.०० ते दि. ०४/१२/२०१७ चे २१.३५ वाजता दरम्यान यातील मृतक सौ. माया वसंता नागपुरकर वय ४८ वर्ष रा. रूयाळ (सिंदपुरी) ही दि. २/१२/२०१७ चे १४.०० वा. सुमारास तिचा मुलगा गिरधर वंसता नागपुरकर याचे सोबत मोटार सायकल क्र. एमएच ३६ ए ३८८७ वर मागे बसुन घरून गावातील बसस्टॉप जात असतांना तिला चक्कर आल्याने, ती मोटार सायकल वरून खाली पडली त्यात तिचे डोक्याला मार लागल्याने ती उपचारा दरम्यान दि. ४/१२/१७ चे २१.३५ वा. नागपुर मेडीकल कॉलेज येथे मरण पावली तिचे मरणा बाबत पो.स्टे. अजनी येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जा.फौ. चे कागद पत्रावरून व मा. पोनी. सा यांचे आदेशाने पो.स्टे. पवनी येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

९) वैनगंगा नदीचे पात्राात इसमाचे प्रेत मिळुन आल्याने मर्ग नोंद :–

दिनांक १०/१२/२०१७ चे १९.०० ते १३/१२/२०१७ चे १७.१८ वाजता दरम्यान यातील मृतक प्रकाश हरिश्चंद्र जुगनायके वय ४५ वर्ष रा. मानेगाव हा दि. १०/१२/२०१७ ला सांयकाळी अंदाजे १९.०० वाजता दरम्यान घरी कोणालाही न सांगता घरून निघुन गेला होता, व आज दि. १३/१२/२०१७ ला त्याचे प्रेत कारधा येथे वैनगंगा नदीचे पात्रात मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी भाष्कर सिताराम सडमते वय ४० वर्ष रा. मानेगाव यांचे तोंडी रिपोर्ट वरून पो.स्टे. कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. मुटकुरे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

१०) अवैध दारू/ जुगार अड्डयांवर धाडी . :–

दिनांक १३/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, सिहोरा, आंधळगाव, पवनी व लाखांदुर ,येथील अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०९ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५५ लिटर हातभट्टी दारू किंमती ३६,००/–रु. व ०३ लिटर ४२० मिलीलीटर देशी / विदेशी दारू कि. १२००/रु तसेच जुगार असा एकुन ९१७ /रु असा एकुन ५,७३७/रु. चा माल जप्त करण्यात आला.

११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक १३/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ८४ केसेस व ईतर वाहनांवरती १० केसेस करण्यात आलेले आहे.

(मपोउपनी. प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.